सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. संतोष परचुरे
संचालक

संदर्भ क्र.:विविमं/२०२१–२२/१८३ तातडीचे व महत्वाचे दि. ०९/०२/२०२२

प्रति,
मा. प्राचार्य / मा. संचालक / मा. विभागप्रमुख
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व
महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व पदवी व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग.

विषय : भारतरत्न गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांना अभिवादन करणेसाठी आयोजित सभेमध्ये सहभागी होणेबाबत..

संदर्भ : मा. सह संचालक, शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे उशिसं/अभिवादन सभा/२०२२/मवि–१/७२२७, दिनांक ०९ फेब्रुवारी, २०२२ चे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये कळविण्यात येते की, भारतरत्न गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांचे रविवार, दिनांक ०६.०२.२०२२ रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या निधनामुळे संगीत व कलाविश्वाची अपरिमित हानी झाली आहे. भारतीय संगीत विश्वातील दिदींचे योगदान अतुलनीय आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासावर त्यांनी आपल्या कामगिरीने अमीट मुद्रा उमटविलेली आहे.

या महान गायिकेला श्रध्दांजली वाहण्यासाठी मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण महाराष्ट्र राज्य यांच्या उपस्थितित दिनांक १०.०२.२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता रुईया महाविद्यालय, मुंबई येथे अभिवादन सभेचे आयोजन केले आहे.

सदर अभिवादन सभेसाठी आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागातील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी व उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भ्रमणध्वनीवर खालील लिंक देऊन युटयुब तसेच फेसबुकच्या माध्यमातून या अभिवादन सभेत दिनांक १०.०२.२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता सहभागी होण्याबाबत सूचित करावे.
लिंक पुढीलप्रमाणे :

युटयुब लिंक : https://youtube.com/channel/UCP2tI2ByPMnxnVgtsmNWYjA

फेसबुक लिंक : https://www.facebook.com/udayravindrasamant/

सदर अभिवादन सभेत सहभागी शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी व उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा तपशील शासनास सादर करावयाचा असल्याने आपला अहवाल विद्यार्थी विकास मंडळ विभागाकडे दिनांक १०.०२.२०२२ रोजी दुपारी १२.३० वाजेपर्यंत **(www. unipune.ac.in – Students' Developement – BSD Online – College Login –For College Users – Login – Main Menu – Students Developement – Menu – Gov. joint scheme proposal report – Other joint scheme proposal –Add New–** योजना निवडा– **भारतरत्न गानसम्राज्ञी लता मंगेशकर अभिवादन सभा**) या लिंकवर ऑनलाईन पद्धतीने अनिवार्यतेने भरण्याबाबत संबंधितांना सूचित करावे. कळावे, ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे.

(डॉ. संतोष परचुरे)
संचालक,
विद्यार्थी विकास मंडळ

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१.
Web:www.dhepune.gov.in E-mail : mavi.dhepune@nic.in
फोन नं. ०२०/२६०५१७२९, २६०५१५१२,

क्रमांक- उशिसं/अभिवादन सभा/२०२२/मवि-१ / 7227 दि. ०९/०२/२०२२
- 9 FEB 2022

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे/अभिमत विद्यापीठे/स्वयंअर्थसहायित विद्यापीठे
सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य

**विषय : भारतरत्न गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांना अभिवादन करणेसाठी आयोजित सभेमध्ये सहभागी होणेबाबत**

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, भारतरत्न गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांचे रविवार दि. ०६.०२.२०२२ रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या निधनामुळे संगीत व कलाविश्वाची अपरिमित हानी झाली आहे

भारतीय संगीत विश्वातील दिदींचे योगदान अतुलनीय आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासावर त्यांनी आपल्या कामगिरीने अमीट मुद्रा उमटविलेली आहे.

या महान गायिकेला श्रध्दांजली वाहण्यासाठी मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण महाराष्ट्र राज्य यांच्या उपस्थितीत **दि १०.०२.२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता** रुईया महाविद्यालय, मुंबई येथे अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले आहे. सदरहू सभेसाठी विद्यापीठीय/महाविद्यालयीन शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी व उच्च शिक्षण घेणा-या सर्व विद्यार्थ्यांना युटयुब तसेच फेसबुकच्या माध्यमातून या अभिवादन सभेत सहभागी होता येईल. युटयुबची लिंक पुढीलप्रमाणे-

https://youtube.com/channel/UCP2tl2ByPMnxnVgtsmNWYjA

फेसबुक लिंक पुढीलप्रमाणे -
https://www.facebook.com/udayravindrasamant/

विद्यापीठांनी सर्व विद्यार्थ्यांना युटयुब लिंक विद्यार्थ्यांच्या भ्रमणध्वनीवर देण्याची व्यवस्था करावी. अभिवादन सभेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचा तपशील खालील विवरणपत्रात विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण यांचेकडे एकत्रित स्वरुपात देण्यात यावा.

| अ.क्र. | महाविद्यालय | एकुण विद्यार्थी संख्या | सभेत सहभागी विद्यार्थी |
|---|---|---|---|
| | | | |

विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी आपल्या विभागाचा एकत्रित अहवाल संचालनालयास दि.१०.०२.२०२२ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत निश्चितपणे सादर करण्यात यावा.

सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी या अभिवादन सभेत सहभागी होतील यासाठी आपले कार्यक्षेत्रातील सर्व महाविद्यालये व विद्यार्थी यांना आपले स्तरावरुन स्वतंत्रपणे अवगत करावे. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना व संचालक, विद्यार्थी विकास मंडळ यांनी यासाठी विद्यार्थ्यांपर्यंत युटयुब लिंक पाठविण्याची विशेष दक्षता घ्यावी.

सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी आपल्या विभागातील सर्व अकृषि विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालयांना आपल्या स्तरावरुन स्वतंत्र कळविण्यात यावे.

(डॉ.प्रकाश बच्छाव)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रत माहितीस्तव सादर**

१.मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
२.स्वीय सहायक, मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई-३२
३. स्वीय सहायक, मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई-३२